# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल: igatpuri.amfu@gmail.com

**८९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०५.०१.२०२१**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (२९/१२/२०२० ते ०४/०१/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०६/०१/२०२१ ते १०/०१/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ | दिनांक | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ६ | ० | ० | ५ | ० |
| २९.० | २८.६ | २९.६ | ३०.२ | २९.५ | ३०.२ | २९.६ | कमाल तापमान (अं. से.) | २८ | २९ | २९ | २९ | १८ |
| १३.२ | १४.२ | १३.५ | १५.४ | १६.४ | १६.२ | १६.४ | किमान तापमान (अं. से.) | १७ | १७ | १८ | १८ | १७ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | अ.ढगाळ | अ.ढगाळ | अ.ढगाळ | अ.ढगाळ | ढगाळ |
| ५० | ५० | ६३ | ८१ | ७७ | ५१ | ८३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६७ | ५८ | ६६ | ७१ | ७२ |
| ३७ | २७ | ३४ | ४९ | ५५ | ५३ | ५३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४७ | ३७ | ४२ | ४६ | ४८ |
| ५.० | ५.० | ६.१ | ३.८ | ३.२ | २.९ | ३.० | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ६ | ४ | ६ | ६ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **पुढील पाच दिवसाच्या अंदाजातील पाचही दिवस आकाश अंशतः ढगाळ ते ढगाळ राहील**<br>**दिनांक ७ व ८ जानेवारीला निवडक भागामध्ये विजांच्या कडकडाटासह मेघगर्जनेची शक्यतेचा इशारा देण्यात आला आहे**<br>**पुढील दोन-तीन दिवसांमध्ये विभागामध्ये किमान तापमानामध्ये कोणताही मोठा बदल होण्याची शक्यता नसल्याचे वर्तविले आहे.** |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल. शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत. तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे. |
| संदेश | | पावसाचा अंदाजानुसार गहू पिकास दुसरे पाणी कांडी धरण्याची अवस्थेत (पेरणीनंतर ४० ते ४५ दिवस) व तिसरे पाणी फुलोरा अवस्थेत (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवस) द्यावे. |
| गहू | शाकीय कांडी धरण्याची अवस्था | पिकास पीक वाढीच्या महत्वाच्या संवेदनशील अवस्थेत म्हणजेच कांडी धरण्याची अवस्था व फुलोरा अवस्था पाणी देणे अत्यंत गरजेचे आहे<br>पावसाचा अंदाज लक्षात घेऊन उत्पादनातील घट टाळण्यासाठी पिकास दुसरे पाणी कांडी धरण्याची अवस्थेत (पेरणीनंतर ४० ते ४५ दिवस) व तिसरे पाणी फुलोरा अवस्थेत (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवस) द्यावे.<br>मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भावाची आर्थिक नुकसान पातळी दिसून येतात १ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्ल्यू जी प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>गव्हामधील तणांच्या नियंत्रणासाठी तणे दोन ते तीन पानांच्या अवस्थेत आल्यावर मेटसल्फ्युरॉन मेथाईल (२० टक्के), हेक्टरी २० ग्रॅम, ८०० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| हरभरा | पुनरुत्पादक अवस्था घाटे लागण्याची अवस्था | घाटे अळीच्या प्रादुर्भावाचा आगाऊ अंदाज समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे ५० मिटर अंतरावर शेतात उभारावेत आणि दर १५ दिवसांनी ल्युर बदलावेत.<br>घाटे अळीच्या प्रादुर्भाव दिसून येताच ५% निंबोळी आर्काची फवारणी करावी.<br>ढगाळ हवामान असल्यामुळे जिरायती हरभऱ्यामध्ये घाटे अळीचा प्रादुर्भाव होऊ शकतो, त्यासाठी एच. एन. पी. व्ही. या विषाणूची १० मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| हरभरा | पुनरुत्पादक अवस्था घाटे लागण्याची अवस्था | ज्या ठिकाणी जिरायत हरभऱ्यात मोठ्या अवस्थेतील घाटे अळी आढळून येत असेल तर इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के दाणेदार ४ ग्रॅम मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे (एकरी २०० लिटर पाणी). जिरायत हरभरा पिकास पाण्याचा ताण आढळून आल्यास २ टक्के युरियाची फवारणी करावी. जिरायत हरभरा घाटे भरण्याच्या अवस्थेत असल्यास १३:००:४५ या खताच्या ५ टक्के द्रावणाची फवारणी करावी. |
| कांदा | | कांदा या पिकावर कमाल व किमान तापमानातील मोठ्या फरकामुळे रस शोषणाऱ्या फुलकिडे व करपा या रोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ ईसी. ६ मिली. अधिक टेब्यूकोनॅझोल १० मिली अधिक स्टिकर १० मिली. प्रति १० लीटर पाण्यातून साध्या हात पंपाने फवारणी हवामानाचा अंदाज घेऊनच करावी. |
| मिरची | | या पिकावर सध्या बोकड्या (लिफ कर्ल), फळसड/ डायबॅक (फांद्या वाळणे), पानावरील ठिपके इत्यादी रोग आढळून आल्यास त्यासाठी फिप्रोनील १५ मिली किंवा थायोमेथोक्झाम ४ ग्रॅम अधिक मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम किंवा डायफेनॅकोनॅझोल १० मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून साध्या हात पंपाने फवारणी करावी. १० दिवसांच्या अंतराने या बुरशीनाशकांच्या आलटून-पालटून २ ते ३ फवारण्या कराव्यात. |
| वांगी | पीक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे वांग्यामध्ये शेंडा आणि फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी ४ % निंबोळी अर्क किंवा सायपरमेथ्रीन २५ ईसी, ५ मिली प्रती १० लीटर पाणी या प्रमाणात फवारावे. दर आठवड्याला किडलेले शेंडे आणि फळे गोळा करून नष्ट करावीत |
| पशुधन | जनावरांची हिवाळ्यात घ्यावयाची काळजी | जनावराना रात्री गोठ्यात ठेवावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा कोरडा ठेवावा. कुक्कुटपालनात, शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन पिल्ले गरम ठेवा. लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे सध्याच्या थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेले जनावरांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनावरांच्या गोठ्यांना बारदान / शेडनेटचे पडदे लावावेत. तसेच गोठय़ामधील उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० व्हॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावीत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोटय़ा जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषतः गाभण गायी-म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| पशुधन | जनावरांची हिवाळ्यात घ्यावयाची काळजी | सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टरपेंटाईनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट-पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाच्या सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अतिथंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. जनावरांना लाळ्या-खुरकुज आजारापासून संरक्षणासाठी लसीकरण करावे. |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

ठिकाण : विकृसंके, इगतपुरी

दिनांक : ०५.०१.२०२१

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**

**तथा सहयोगी संशोधन संचालक,**

**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**